Module - 3

# प्रसूतीपूर्व तयारी

## आरोग्य संस्था व घरी होणाऱ्या प्रसूती करीता

### अभ्यास विषय M १







## समिक्षा प्रश्न

# प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतर त्वरीत गृहभेट

बैठकीमध्ये सर्व सदस्यांचे स्वागत करा.
सांगी की, पहिले मागील महिन्यात निर्धारीत कामाची आपण समिक्षा करु.

विचारा :
मागील महिन्यातील आमचे कार्यबिंदु काय होते ?

उजव्या बाजूला दिलेल्या मुद्यांच्या मदतीने कामाची समिक्षा करा

❖ मागील महिन्यात ज्या मातांच्या प्रसूती झाल्यात त्या सर्व मातांना आपण प्रसूतीपूर्व भेटी देऊ शकलो काय ?

❖ मागील महिन्यात ज्या मातांच्या प्रसूती झाल्यात त्या सर्व मातांना प्रसूतीनंतर किती वेळात आपण भेटी दिल्यात ?
  - आपण प्रसूतीचे वेळी हजर राहू शकलो काय ? (नाही तर का नाही ?)
  - आपण प्रसूतीचे दिवशी दिवसभरात भेट देऊ शकलो काय ? (नाही तर का नाही ?)
  - माता दवाखान्यात प्रसूती करुन परतल्यानंतर त्याच दिवशी आपण गृहभेट करु शकलो काय ? (नाही तर का नाही ?)

❖ प्रसूती दरम्यान व प्रसूती पश्च्यात कोणत्य मातेला काही समस्या आली काय ? या समस्येचा निपटारा करण्याकरीता कुटूंब सुरूवातीपासुन तयार होते काय ?

❖ सर्वच कुटुंब नवजात बाळाच्या जन्म :नंतर लगेच योग्य तऱ्हेने नवजात बाळाची देखभाल करत आहे काय ? या व्यतिरिक्त काय काय करतात ?
  - लगेच स्तनपान आणि फक्त स्तनपान, वरून काहीही पिण्यास देऊ नये.
  - बाळास पुरेशा प्रमाणात उबदार ठेवणे / शरीराचे योग्य तापमान ठेवणे.
  - नाळेवर काहीही न लावणे, तसेच नाळेला स्वच्छ ठेवणे.

**मागील महीन्यातील कार्यबिंदु :**

- गट अ चे सर्व कार्यकर्त्यांनी डाटा ट्रान्स्फर शिट मधून १ वर्षापर्यंतच्या सर्व बाळांची नावे आणि सर्व गर्भवती मातांची नावे गृहभेट रजिस्टरमध्ये लिहीण्याचे कार्य पूर्ण करुन घ्यावे.

- गट ब हे सुध्दा आपल्या क्षेत्रातील सुटलेल्या बाळांची व गर्भवती मातांची नावे गृहभेट रजिस्टर मध्ये लिहीण्याचे काम पूर्ण करतील.

- सर्व बालके व गर्भवती मातांच्या तारखा काढून कॅलेन्डर महिन्यातील रकान्यात भरण्याचे काम पूर्ण करुन घ्यावे.

- पुढील महिन्यात ज्यांच्या संभाव्य प्रसूती होणार आहे, त्या सर्व गर्भवती मातांकडे आपण गृहभेट करणार आहोत.

- याच महिलांकडे प्रसूती नंतर लगेच आपण गृहभेट करणार आहोत.





## प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात त्वरीत गृहभेट

- ❖ गृहभेट योजना रजिस्टरमध्ये सर्व नावे नोंदलेली आहेत काय?
- ❖ मागील महिन्यात ज्या मातांच्या प्रसूती झाल्या, त्यांचे घरी आपण प्रसूतीपूर्व गृहभेट करु शकलो काय?
- ❖ यांचेकडे प्रसूतीपश्यात किती वेळात गृहभेट करु शकलो?






# प्रसूतीपूर्व तयारीची आवश्यकता

**सांगा की, आता आपण आजच्या नविन विषयाची सुरवात करणार आहोत.**

**प्रसूतीच्या संभाव्य तयारीबाबत कार्यकर्त्यांना भरपूर माहीती असेल, या माहीतीला चर्चेद्वारे बाहेर काढावयाचे आहे.**

**कार्ड दाखवून विचारा :**

- जर कुटूंबाने काहीच तयारी केली नसेल तर काय नुकसान होवू शकते ?
- कोणती तयारी करावयाची आहे याची माहिति कुटूंबाला असते काय ?
- त्यांना या गोष्टी समजण्याकरीता आपण कशी मदत करु शकतो ?




# प्रसूतीची तयारी करणे का आवश्यक आहे?



- ❖ प्रसूती करीता कोणती तयारी करावी?

- ❖ साधारणत: कुटूंब कोणकोणत्या गोष्टींची तयारी करतात आणि कोणकोणत्या गोष्टीला विसरून जातात?







# आरोग्य संस्थेत प्रसूती करण्याची तयारी

**समजावून सांगा :**

जास्तीत जास्त कुटूंब आरोग्य संस्थेत प्रसूती करण्यास इच्छुक असतात, परंतु काही कुटूंब घरीच प्रसूती करणे पसंत करतात. परंतु जे कुटूंब घरी प्रसूती करणे पसंत करतात त्यांना सुध्दा शेवटच्या वेळेत काही गुंतागुंत/घाई झाल्यास आरोग्य संस्थेत जावे लागते. करीता प्रत्येक कुटूंबाने आरोग्य संस्थेत प्रसूती करण्याकरीता तयारी करुण घेणे आवश्यक आहे.

**कार्ड दाखवून कोणत्याही कार्यकर्त्याला लिहीलेल्या बिंदुना वाचण्यास सांगा. उजव्या बाजुला लिहीलेल्या मुद्यांचा उपयोग करुन प्रत्येक बिंदुवर विस्ताराने चर्चा करा. चर्चेसाठी कार्यक्षेत्रातील उदाहरणांचा प्रयोग करा. वेगवेगळया गावांची योजना वेगवेगळी असू शकते.**

**सर्व बिंदुवर चर्चा झाल्यानंतर विचारा** '' काही सुटले तर नाही ना? शेवटी विचारा सर्व कुटूंब ही सर्व तयारी करतात काय? आपण या कुटूंबांच्या तयारी मध्ये काही मदत करु शकतो काय?

**याबाबत सविस्तर माहितीकरीता पाहा-**

**आशा मोडयुल ६, भाग ख आणि परिशिष्ठ ३, आणि आई.सी.डी.एस. चे रजिस्टर ८ मध्ये गृहभेटीच्या वेळी वयानुसार संदेश सुची**

❖ **योग्य आरोग्य संस्था :**
- प्रशिक्षित नर्स आणि डॉक्टरची उपलब्धता
- २४ तास आरोग्य सेवेची उपलब्धता
- दिवसा किंवा रात्री सहज पोहचण्यास योग्य.
- आपल्या क्षेत्रात सर्वात चांगल्या आरोग्य संस्था कोणत्या आहेत?


❖ **वाहन व त्याचे संपर्क क्रमांक :**
- फोन क्रमांक आहे, हे विश्वासु आहेत, कोणत्याही वेळी उपलब्ध राहील?
- स्वस्त किंवा मोफत

❖ **सोबत जाण्याकरीता व्यक्ती :**
- माता व बालकाच्या देखभालीकरीता
- आवश्यकता पडल्यास धावपळ करण्यासाठी

❖ **पुरेसे पैसे/धन :**
- आरोग्य संस्थेत जाण्या-येण्याकरीता
- औषधी खरेदी करण्याकरीता
- कोणत्याही आकस्मिक / गुंतागुंतीकरीता
- सोबत जाणाऱ्यांना जेवण देण्याकरीता

❖ **आवश्यक कागदपत्र :**
- जननी सुरक्षा योजना/किंवा इतर दुसऱ्या योजनेकरीता

❖ **घराकडे लक्ष देण्याकरीता :**
- कमीत कमी दोन दिवसांसाठी
- त्यांच्या विषयी विचार करा, ज्यांच्यावर लक्ष ठेवण्याची गरज आहे.



# आरोग्य संस्थेत प्रसूती करण्याची तयारी

- योग्य आरोग्य संस्था कोणती आहे?
- कोणते वाहन, कोणता संपर्क क्रमांक ज्यावर संपर्क केल्यास वाहन येईल?
- माता आणि बालकाकरीता कोणते कपडे आवश्यक?
- सोबत कोण जाणार?
- किती पैसे/धनाची आवश्यकत: पडू शकते?
- घराकडे लक्ष कोण देणार?










# घरी प्रसूती करण्याकरीता तयारी

जास्तीत जास्त कुटूंब आरोग्य संस्थेत प्रसूती करण्यास इच्छुक असतात, परंतु काही कुटूंब घरीच प्रसूती करणे पसंत करतात. परंतु जे कुटूंब आरोग्य संस्थेत प्रसूती करणे पसंत करतात त्यांना सुध्दा शेवटच्या वेळेत घरीच प्रसूती करावी लागते. करिता प्रत्येक कुटूंबाने घरी प्रसूती करण्याकरीता तयारी करुन घेणे आवश्यक आहे.

कार्ड दाखवून कोणत्याही कार्यकर्त्याला लिहिलेल्या बिंदुना वाचण्यास सांगा. उजव्या बाजुला लिहिलेल्या मुद्यांचा उपयोग करुन प्रत्येक बिंदुवर विस्ताराने चर्चा करा. चर्चेसाठी कार्यक्षेत्रातील उदाहरणांचा प्रयोग करा. वेगवेगळया गावांची योजना वेगवेगळी होऊ शकते.
सर्व बिंदुवर चर्चा झाल्यानंतर विचारा "काही सुटले तर नाही ना?"

शेवटी विचारा "प्रत्येक कुटूंब ही सर्व तयारी करते काय? आपण या कुटूंबाच्या तयारी मध्ये काही मदत करु शकतो काय?
शेवटी त्यांना भर देऊन सांगा की, जे कुटूंब घरीच प्रसूती करणे पसंत करतात त्यांना सुध्दा ही सर्व तयारी करणे आवश्यक आहे कारण आवश्यकता पडल्यास या सर्व गोष्टी आरोग्य संस्थेत प्रसूती करण्याकरीता सुध्दा उपयोगात आणता येवू शकतात.
याबाबत सविस्तर माहितीकरीता पाहा-
आशा मोडयुल ६, भाग बी आणि परिशिष्ठ ३, आणि आई.सी.डी.एस. चे रजिस्टर ८ मध्ये गृहभेटीच्या वेळी वयानुसार संदेश सुची

❖ **नविन ब्लेड आणि स्वच्छ दोरा**
- नुकतेच खरेदी केलेले ब्लेड असावे, ब्लेडचे पॅकिंग नाळ कापण्याच्या वेळी उघडावे, आणि पाण्याने धुवू नये.
- नविन स्वच्छ दोरा - दोन तुकडे, ६ इंच लांब, नविन रिलचा, आणि शक्यतोवर पाण्यामध्ये उकळून व उन्हात वाळवून

❖ **साबन**
- प्रसूतीपुर्व प्रसूतीमध्ये मदत करणाऱ्यांचे हात धुण्याकरीता

❖ **स्वच्छ चादर (कपडा/प्लास्टीक)**
- फरशी खराब होऊ नये म्हणून प्लास्टीक
- रक्त आणि इतर द्रव्य शोषन्याकरिता कपडा

❖ **मातेकरीता स्वच्छ कपडा**
- पॅडसारखे वापर करण्यासाठी धुतलेले आणि उन्हात वाळवलेले कमीत कमी ६ कपडयाचे तुकडे

❖ **प्रसूती करण्यासाठी जागा**
- पुरेसा प्रकाश असलेली किंवा बल्ब असलेली
- सहज स्वच्छ होण्यासारखी

❖ **कुशल प्रसाविका**
- प्रशिक्षित दायी, योग्य नर्स किंवा डॉक्टर
- ज्यांना आवश्यकता पडताच घरी बोलावल्या जाईल, ज्यांना संपर्क क्रमांक उपलब्ध आहे.


❖ **मदत करण्यासाठी महिला**
- प्रसूतीमध्ये मदत करण्यासाठी एक अनुभवी महिला




# घरी प्रसूती करण्याकरीता तयारी



- नविन ब्लेड आणि स्वच्छ धागा, हात धुण्यासाठी साबण
- प्रसूतीचे वेळी मातेला लेटण्याकरीता स्वच्छ चादर (कपडा/प्लास्टीक)
- मातेकरीता स्वच्छ कपडा किंवा पॅड
- घरी प्रसूती करीता चांगला प्रकाश असलेली जागा
- कुशल प्रसाविका, ज्यांचा संपर्क क्रमांक उपलब्ध आहे
- मदतीकरीता महिला











# प्रसूतीच्या तयारीची योग्य वेळ

कार्ड दाखवून प्रत्येक प्रश्नाबाबत विस्ताराने चर्चा करा.

उजव्या बाजूला दिलेल्या बिंदुचा उपयोग करुन चर्चा पुढे न्या.

**चर्चा करा -**

प्रसूतीची तयारी गर्भधारणेची माहिती कळताच सुरु करावी, विशेष करुन पैशाची बचत. बहुतांशी कुटूंब सांझी (पाळण्यावर बसविणे) पर्यंत प्रसूतीची तयारी सुरु करतात. कुटूंबाने नऊ महिणे पूर्ण होईपर्यंत सर्व तयारी करुन घेणे सर्वात चांगले.


- गरीब कुटूंबानी गर्भधारणेची माहिती मिळताच पैसे बचत करणे सुरु करावे.
- सातव्या महिन्यापर्यंत ब्लेड, धागा, कपडा सर्व तयार करुन घ्यावे कारण त्यानंतर प्रसूती कधीही होवू शकते.
- सातव्या महिन्यापर्यंत योग्य आरोग्य संस्थेची निवड करावी, शक्यतोवर मातेने प्रसूतीपुर्व कमीत कमी १ वेळ आरोग्य संस्थेत तपासणी करुन घ्यावी.
- आरोग्य संस्थेत किंवा घरी प्रसूती करण्याकरीता सर्व तयारी नवव्या महिन्यापर्यंत करुन घ्यावी.
- हे सुनिश्चित करण्यासाठी अंगणवाडी सेविका/आशा कार्यकर्ती ने शेवटच्या तिमाहीत कमीत कमी दोन वेळा गृहभेटी करावी.
    - सातव्या महिन्यात कमीत कमी १ वेळा प्रसूतीची तयारी पाहणे व सल्ला देण्याकरीता.
    - नवव्या महिन्यात कमीत कमी १ वेळा प्रसूतीची तयारी पूर्ण झाली की नाही हे पाहणे.



# प्रसूतीच्या तयारीची योग्य वेळ



- कुटूंबाला गर्भधारणेची माहिती कळल्यानंतर प्रसूतीची तयारी कधी पासून सुरु करतात ?
- त्यांना कधी पासून तयारी सुरु करणे आवश्यक आहे ?
- आपण त्यांना मदत करणे कधी पासून सुरु करावे ?






# सारांश: प्रसूतीची तयारी कशी करावी

कार्ड दाखवून कोणत्याही कार्यकर्ती/आशा ला सर्व बिंदु वाचण्यास सांगा.

सर्व कार्यकर्ती/आशा यांना लक्ष देवून ऐकण्यास सांगा आणि प्रश्न विचारण्यास प्रोत्साहित करा.





# सारांश : प्रसूतीची तयारी कशी करावी



प्रत्येक गर्भवती मातेचे कुटूंबाला आरोग्य संस्था किंवा घरी प्रसूती करण्याकरीता तयारी करणे आवश्यक आहे.

प्रसूतीची तयारी गर्भधारणेची माहिती कळताच वा सांझी पर्यंत सुरू करावी.

आपण या कुटूंबाकडे कमीत कमी दोन वेळा गृहभेट केली पाहिजे. पहिल्यावेळी तयारी सुरु करुन घेण्यासाठी आणि दुसऱ्या वेळी तयारी पूर्ण झाली किंवा नाही हे सुनिश्चित करण्यासाठी.


**आरोग्य संस्थेत प्रसूती करीता**

- योग्य आरोग्य संस्था
- वाहन, संपर्क क्रमांकासह
- माता आणि बालकाकरीता कपडे
- सोबत जाण्यासाठी व्यक्ती
- पुरेसे पैसे/धन
- जे.एस.वाय. करिता आवश्यक कागदपत्रे
- घराकडे लक्ष ठेवण्यासाठी कोणीतरी

**घरी प्रसूतीकरीता**

- नविन ब्लेड आणि दोरा
- साबण
- स्वच्छ चादर (कपडा/प्लास्टीक)
- मातेकरीता स्वच्छ कपडा
- प्रसूतीकरीता घरी जागा
- कुशल प्रसाविका, संपर्क क्रमांक
- मदतीसाठी महिला






# अभ्यास : कुटूंबांना प्रसूतीपुर्व तयारी बाबत सल्ला देण्याकरीता रोल प्ले / नाटयरुपांतरण

**आरोग्य संस्थेत किंवा घरी प्रसूती करण्यासाठी कुटूंबांना प्रसूतीपुर्व तयारी समजावून सांगण्यासाठी, एक कार्यकर्ती आणि आशा यांनी त्यांच्या सोबत कशी चर्चा करावी याचा एक रोल प्ले/नाटयरुपांतरण करण्यास मदत करा.**

**उजव्या बाजूला दिलेल्या बिंदुचा उपयोग करुन रोल प्ले/नाटयरूपांतरण करुन घ्या.**

- गृहभेट रजिस्टरचा उपयोग करुन कोणत्याही कार्यकर्तीला अशा एका गर्भवती मातेचे नाव निवडण्यास सांगा जीचा सातवा महिना सुरु आहे. कार्यकर्तीने योग्य मातेची निवड केली आहे किंवा नाही याची पडताळणी करण्याकरीता दुसऱ्या कार्यकर्तीला सांगा
- काही कार्यकर्ती आणि आशाला पुढे येवून रोल प्ले मध्ये खालील भुमिका करण्यास सांगा.
  - सातव्या महिन्याची गर्भवती माता
  - सासू
  - पती
  - अंगणवाडी कार्यकर्ती / आशा
- अंगणवाडी कार्यकर्ती/आशा करीता निर्देश:

  सर्वात पहीले कुटूंबाच्या प्रसूतीपुर्व तयारी विषयी विचारा आणि अवलोकन करा, केलेल्या तयारीची प्रशंसा करा आणि तयारी मध्ये ज्या त्रुटी आहेत फक्त त्याविषयी सल्ला देण्यास सांगा.
- रोल प्ले च्या पाच मिनीटानंतर, सल्ला देतांना काय योग्य आणि काय चुकिचे झाले हे उर्वरित कार्यकर्तींना विचारा.
- शेवटी सर्व कार्यकर्तींना विचारा, “काय चुकिचे झाले असते” जेव्हा
  - कुटूंबाकडे गृहभेट झाली नसती आणि त्यांना कोणताच सल्ला मिळाला नसता.
  - या कुटूंबाकडे खुप उशिरा किंवा प्रसूतीच्या काही दिवस अगोदर गृहभेट केली असती.



# अभ्यास : कुटूंबांना प्रसूतीपुर्व तयारी बाबत सल्ला देण्याकरीता रोल प्ले / नाटयरुपांतरण



❖ प्रसूतीपुर्व तयारी सुनिश्चित करण्यासाठी आपण कुटूंबासोबत कशी चर्चा करावी ?





# तिसऱ्या तिमाहीतील मातेची योग्य तऱ्हेने निवड

**कार्ड दाखवा**

सर्व अंगणवाडी कार्यकर्ती आणि आशांना त्यांच्या गृहभेट रजिस्टरचा उपयोग करुन तिसऱ्या तिमाहीतील मातांना निवडण्यास सांगा.

सर्वांना विचारा की, त्या अशा किती मातांना निवडू शकल्या ?

(सर्वसाधारण एका गावात ज्याची लोकसंख्या जवळपास १००० असेल त्यामध्ये अशा मातांची संख्या सर्वसाधारण ५ ते ८ असते)

जर कोणाला अशा माता निवडण्यास अडचण आली तर दुसऱ्या अंगणवाडी सेविका/आशाला त्यांची मदत करण्यास सांगा.


यानंतर त्यांना विचारा की, यामधील कोणकोणत्या माता सध्यास्थितीत गर्भारपणाच्या सातव्या महिन्यात आहे आणि कोणकोणत्या माता नवव्या महिन्यात आहे.

उजव्या बाजूला दिलेल्या निर्देशांचा उपयोग करुन सर्व कार्यकर्त्यांना हे समजण्यास मदत करा.

आपल्याला प्रत्येक मातेचा गर्भारपणाचा महिना माहित असणे अत्यंत आवश्यक असल्याचे ठासून सांगा, याकरीता आपल्याला प्रत्येक गर्भवती मातेची नोंदणी लवकरात लवकर करुन घेणे तसेच त्यांची योग्य एल.एम.पी. आणि ई.डी.डी. अंगणवाडी केंद्रात नोंदतेवेळी लिहून घेणे जरुरी आहे.

- तिसऱ्या तिमाहीचा अर्थ - गर्भारपणाचे शेवटचे तीन महिने (७वा, ८वा व ९ वा महिना)
- रजिस्टर ८ (गृहभेट योजना रजिस्टर) च्या कॉलम ४ मध्ये आपण मातेची तिसरी गृहभेट लिहीतो. तिसऱ्या तिमाहीतील माता ओळखण्याकरीता कॉलम ४ मध्ये लिहिलेल्या कॅलेन्डर महिन्याचा उपयोग करा.
- **उदाहरण :**
  - समजा हा जुलै महीना आहे.
  - खालील चित्रात बघा. शकुंतलादेवी जुन ते ऑगस्ट महीन्यात गर्भारपणाच्या तिसऱ्या तिमाहीत आहे, कारण कॉलम ४ मध्ये आपण जून-ऑगस्ट लिहीलेले आहे. याचा अर्थ या महीन्यात (जुलै) ती तिसऱ्या तिमाहीत आहे.
  - यावरुन आपल्याला हे सुध्दा कळते की जून महीन्यात शकुंतलादेवीचा गर्भारपणाचा सातवा महीना होता जुलै मध्ये आठवा आहे आणि पुढील महीन्यात माहे ऑगस्ट मध्ये तिचा नववा महीना राहील.
- जर आपल्या गृहभेट योजना रजिस्टर योग्य तऱ्हेने तयार केले असेल तर आपणास कोणत्याही

| १ | २ | | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| कुटूंब किंवा व्यक्तिच क्रमांक | माता आणि बालकाचे नाव | | | |
| कुटूंब संख्या ००७ | कॅलेन्डर महीना | | मार्च - मे | जून - ऑगस्ट |
| कुटूंबातील क्रम संख्या ७ | मातेचे नाव | शकुंतला देवी | | १२/०७/२०१२ २०/०८/२०१२ |
| | प्रसूतीची संभाव्य तारीख | २८/०९/२०१२ | | |
| | प्रसूतीची तारीख | २५/०८/२०१२ | | |
| कुटूंबातील क्रम संख्या ११ | चिंटु कुमार | | | |




# तिसऱ्या तिमाहीतील मातेची योग्य तऱ्हेने निवड



- आपण गृहभेट योजना रजिस्टर उपयोग करुन या महीन्यात तिसऱ्या तिमाहीतील सर्व गर्भवती मातांची निवड करु.

- त्यापैकी या महीन्यात सातव्या आणि नवव्या महिन्यातील गर्भवती मातांची आपण निवड करु.









# पुढील महीन्याकरीता कार्यबिंदु


## तिसऱ्या तिमाहीत दोन गृहभेटी करुन तयारी सुनिश्चित करा.

कार्ड दाखवून प्रत्येक बिंदुवर संक्षिप्त चर्चा करा.

अधिक लक्ष द्या

- सातव्या महिन्यातील गृहभेट
- नवव्या महीन्यातील गृहभेट
- काही गुंतागुंत असल्यास सातव्या महीन्यात अतिरिक्त गृहभेटीची आवश्यकता
- जर प्रसूतीची तयारी पूर्ण झाली नसेल तर अतिरिक्त गृहभेटीची आवश्यकता
- गृहभेटीत सुरवातीला विचारा, बघा आणि समजून घ्या नंतर सल्ला द्या
- या करीता आशा मोडयुल ६ आाणि रजिस्टर ८ मध्ये गृहभेटीच्या वेळी वयानुसार संदेश सुचीला आवश्यकतेनुसार बघा.

पुन्हा आवश्यकता पडल्यास सारांश कार्डचा उपयोग करा.



# पुढच्या महिन्याकरीता कार्यबिंदु



## तिसऱ्या तिमाहीत दोन गृहभेटी करुन तयारी सुनिश्चित करा.

❖ सातव्या महीन्यात गर्भवती मातेकडे आपण गृहभेट करु.

❖ कुटूंबाला भेटून समजून घेवू.

- कुटूंबाने आरोग्य संस्थेत प्रसूतीची तयारी केली आहे काय?
- कुटूंबाने घरी प्रसूतीची तयारी केली आहे काय?
- कुटूंबातील जबाबदार व्यक्ती प्रसूतीच्या तयारीमध्ये सहभागी आहे काय?

❖ तयारी मध्ये त्रूटी असल्यास योग्य सल्ला देवू.

❖ नवव्या महीन्यात पुन्हा गृहभेट करु आणि प्रसूतीची तयारी पुर्ण झाल्याचे सुनिश्चित करु.





